Registered No. B. 1.

THE

Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 15TH APRIL 1897.

Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.

PART IX.—Marathi Acts, &c.

रेव्हेन्यू डिपार्टमेंट.

मुक्काम बंदिरे मुंबई, तारीख १० माहे मार्च सन १८९७.

नंबर १९१२.—हिंदुस्थान सरकारचा खालीं लिहिलेला जाहिरनामा पुनः प्रसिद्ध केला असे:—

"फिनान्स ॲण्ड कामर्स डिपार्टमेंट.

सेपरेट रेव्हेन्यू.

स्टांप.

नान् जुडीशियल स्टांप.

मुक्काम कलकत्ता, तारीख ९ माहे मार्च सन १८९७.

नंबर १०४२–एस्. आर.—हिंदुस्थानचा स्टांप आक्ट (सन १८७९ चा १ ला) याचें कलम ८, रकम (अ), यावरून दिलेले अधिकार चालवून गव्हरनर जनरल इन् कौन्सिल यांनीं खालीं लिहिलेल्या दस्तऐवजांवर द्यावयाची ड्यूटी माफ केली आहे: ते येणेंप्रमाणें:—

(१) सरकारासाठीं खसखसीच्या झाडांची लागवड करण्याकरितां लंबरदारांनीं किंवा खत्तादारांनीं केलेला करार किंवा कराराची यादी;

(२) सरकारासाठीं खसखसीच्या झाडांची लागवड करण्याकरितां तगाई घेणाऱ्या लंबरदारांच्या किंवा खत्तादारांच्या जामिनांनीं करून दिलेलें गहाणखत, आणि

(३) बंगालच्या लेफ्टेनेंट गव्हर्नरांच्या वहिवाटींत असलेल्या मुलुकापैकीं राजशाही जिल्ह्यांत गांजाच्या झाडांची लागवड करण्याकरितां किंवा त्यासंबंधानें रयत लोकांनीं केलेला करार किंवा कराराची यादी.

(सही) जे. एफ्. फिन्ले,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार."

आलीजाह गव्हर्नर साहेब बहादुर इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून,

(सही) जे. मॉन्टीथ,
आक्टिंग चीफ सेक्रेटरी निसबत सरकार.

(True translation.)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.

हिंदुस्थान सरकार.

लेजिस्लेटिव डिपार्टमेंट.

हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या खालीं लिहिलेल्या आक्टास आलीजाह गव्हर्नर जनरल यांनीं तारीख ११ माहे मार्च सन १८९७ रोजीं संमति दिली आणि तो लोकांच्या माहितीसाठीं यावरून प्रसिद्ध केला असेः—

सन १८९७ चा आक्ट १० वा.

सन १८९७ चा सामान्य कलमांचा आक्ट.

अनुक्रमणिका.

प्रथमारंभींचे ठराव.

कलमें.

१. लहान सरनामा व सुरवात.

२. आक्ट रद्द करणें.

सामान्य व्याख्या.

३. व्याख्या.

४. वरील व्याख्या पूर्वींच्या कायद्यांस लागू करणें.

अर्थ करण्यासंबंधाचे सामान्य नियम.

५ कायदे अमलांत येणें.

६. रद्द करण्याचा परिणाम.

७. रद्द केलेले कायदे पुनः चालू करणें.

८. रद्द केलेल्या कायद्यांवर दिलेल्या हवाल्यांचा अर्थ.

९. मुदत सुरू होणें व ती संपणें.

कलमें.

१०. मुदत मोजणें.

११. अंतरें मोजणें.

१२. कायद्यांतला ड्यूटीचा दर प्रमाणानें समजावा.

१३. लिंग व वचन.

अधिकार व कामदार.

१४. सरकारास दिलेले अधिकार वेळोवेळीं चालविणें.

१५. नेमणूक करण्याच्या अधिकारांत, हुद्याच्या नात्यानें नेमणूक करण्याच्या अधिकाराचा समावेश होतो.

१६. नेमणूक करण्याच्या अधिकारांत सस्पेंड करण्याच्या किंवा बर्तर्फ करण्याच्या अधिकाराचा समावेश होतो.

कलमें.

१७. एका अधिकाऱ्याचे जागेवर दुसरा अधिकारी नेमणें.

१८. स्थानापन्न.

१९. मुख्य अधिकारी व त्यांचे ताब्यांतील अमलदार.

कायद्यांअन्वयें केलेले हुकुम, कानू इत्यादिकांच्या संबंधानें ठराव.

२०. कायद्याअन्वयें काढलेल्या हुकुम वगैरेंचा अर्थ करणें.

२१. हुकुम, कानू अगर पोटकायदे करण्याच्या अधिकारांत त्या हुकुमांत, कानूंत अगर पोटकायद्यांत जास्त मजकूर घालण्याच्या, ते सुधारण्याच्या, त्यांत फेरफार करण्याच्या अगर ते रद्द करण्याच्या अधिकाराचा समावेश होतो.

२२. कायदा ठरणें व सुरू होणें यांच्या दरमियान कानू अगर पोट कायदे करणें आणि हुकुम फर्माविणें.

कलमें.

२३. पूर्वी प्रसिद्ध करून कानू अगर पोटकायदे ठरवणें या गोष्टीस लागू असणारे ठराव.

२४. रद्द करून पुन: ठरविलेल्या कायद्याअन्वयें केलेले हुकुम वगैरे चालू असणें.

किरकोळ.

२५. दंड वसूल करणें.

२६. दोन अगर जास्त कायद्यांअन्वयें शिक्षा करण्यास लायक अशा अपराधांबद्दल ठराव.

२७. पोस्टाच्या द्वारें बजावणें याचा अर्थ.

२८. कायद्यांचा उल्लेख करणें.

२९. पूर्वीचे कायदे, कानू व पोटकायदे कायम राखणें.

परिशिष्ट.

रद्द केलेले कायदे.

सन १८६८ व सन १८८७ चे सामान्य कलमांचे आक्ट एकत्र करून त्यांची व्याप्ति वाढविण्याकरितां आक्ट.

ज्यापेक्षां सन १८६८ व सन १८८७ चे सामान्य कलमांचे आक्ट एकत्र करून त्यांची व्याप्ति वाढविणें योग्य आहे, त्यापेक्षां यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविलें आहे:—

प्रथमारंभींचे ठराव.

लहान सरनामा व सुरवात. **१.** (१) ह्या आक्टास सन १८९७ चा सामान्य कलमांचा आक्ट असें ह्मणावें; आणि

(२) तो लागलाच अमलांत येईल.

रद्द करणें. **२.** परिशिष्टांत सांगितलेले आक्ट त्या परिशिष्टाच्या चौथ्या कोष्टकांत निर्दिष्ट केलें आहे तेथवर रद्द केले आहेत.

सामान्य व्याख्या.

३. ह्या आक्टांत, व हा आक्ट सुरू झाल्यानंतर गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं केलेल्या सर्व आक्टांत आणि सर्व रेग्युलेशनांत विषयावरून किंवा पूर्वापर संबंधावरून बाध येत नसेल तर,— व्याख्या.

(१) "साह्य करणें" ही संज्ञा, व व्याकरणाच्या संबंधानें तिचीं होणारीं रूपांतरें व तज्जातीय शब्द यांचा अर्थ, हिंदुस्थानच्या अपराध्यांस शिक्षा करण्याबाबदच्या कायद्यांत आहे तोच आहे : "साह्य करणें."

(२) "कृत्य" हा शब्द एकाद्या गुन्ह्याच्या संबंधानें अथवा एकाद्या दिवाणी नुकसानाच्या संबंधानें वापरण्यांत येतो तेव्हां त्यांत कृत्यांच्या मालिकेचा समावेश होतो, आणि जे शब्द कृत्यांच्या करण्यास लागू आहेत, ते शब्द, गैरकायद्यानें केलेलें जें कृत्यांचें वर्जन त्यासही लागू आहेत: "कृत्य."

(३) "आफिडेव्हिट" या शब्दांत, ज्या मनुष्यांस शपथेबद्दल प्रतिज्ञा किंवा इकरार करण्याची कायद्याची परवानगी असेल त्या मनुष्यांच्या बाबतींत प्रतिज्ञा व इकरार यांचा समावेश होतो. "आफिडेव्हिट."

(४) "बारिस्टर" या शब्दाचा अर्थ इंग्लंडचा किंवा ऐर्लंडचा बारिस्टर किंवा स्काटलंडांतील फ्याकल्टी आफ् आडव्होकेट्स्चा मेंबर असा आहे : "बारिस्टर."

(५) "बंगालचा आक्ट" या संज्ञेचा अर्थ, सन १८६१ व सन १८९२ च्या हिंदुस्थानांतील कौन्सिलांबाबदच्या आक्टांवरहुकूम बंगालचे लेफ्टेनेंट गव्हर्नर इन् कौन्सिल यांनीं केलेला कोणताही आक्ट असा आहे : "बंगालचा आक्ट."

(६) "मुंबईचा आक्ट" या संज्ञेचा अर्थ, सन १८६१ व सन १८९२ च्या हिंदुस्थानांतील कौन्सिलांबाबदच्या आक्टांवरहुकूम मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल यांनीं केलेला कोणताही आक्ट असा आहे : "मुंबईचा आक्ट."

(७) "ब्रिटिश हिंदुस्थान" या संज्ञेचा अर्थ, मलिका माआझमांच्या राज्यांतील ज्या ज्या मुलकांचा आणि जाग्यांचा, त्या त्या वेळीं, मलिका माआझमा, हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांचे मार्फत अथवा हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांच्या ताब्यांतील कोणत्याही गव्हर्नराच्या अथवा दुसऱ्या एकाद्या अमलदाराच्या मार्फत राज्यकारभार चालवीत असतील, ते सगळे मुलूक व जागा असा आहे : "ब्रिटिश हिंदुस्थान.

(८) "ब्रिटिश मुलूक" या संज्ञेचा अर्थ, संयुक्त राज्यशिवायकरून मलिका माआझमांच्या राज्याचा कोणताही भाग, असा आहे : आणि त्या राज्यांतील कोणताही भाग जेव्हां मुख्य आणि स्थानिक कायदे करणारी अशा दोन्ही मंडळ्यांच्या हुकुमाखालीं असेल तेव्हां त्या मुख्य कायदे करणाऱ्या मंडळीच्या ताब्यांतील सर्व भाग या व्याख्येच्या कारणासाठीं एकच ब्रिटिश मुलूख आहे असें समजलें पाहिजे : "ब्रिटिश मुलूक."

(९) "बाब" या शब्दाचा अर्थ, ज्या आक्टांत अथवा रेग्युलेशनांत सदर्हू शब्द येईल त्या आक्टाची अगर रेग्युलेशनची बाब असा आहे : "बाब."

(१०) "कलेक्टर" या शब्दाचा अर्थ, इलाखा-शहरांत, प्रसंगाप्रमाणें, कलकत्त्याचा, मद्रासचा अथवा मुंबईचा कलेक्टर आणि दुसऱ्या ठिकाणीं, जिल्ह्याचा महसूलसंबंधी कारभार ज्याचे स्वाधीन असेल तो मुख्य अमलदार असा आहे : "कलेक्टर."

(११) "वसाहत" या शब्दाचा अर्थ, ब्रिटिश ऐलंड्स आणि ब्रिटिश हिंदुस्थान हीं शिवायकरून मलिका माआझमांच्या राज्याचा कोणताही भाग, असा आहे : आणि त्या राज्यांतील कोणताही भाग जेव्हां मुख्य आणि स्थानिक कायदे करणारी अशा दोन्ही मंडळ्यांच्या हुकुमाखालीं असेल, तेव्हां त्या मुख्य कायदा करणाऱ्या मंडळीच्या ताब्यांतील सर्व भाग मिळून ह्या व्याख्येच्या कारणासाठीं एकच वसाहत आहे असें समजलें पाहिजे : "वसाहत."

"सुरवात."

(१२) "सुरवात" या शब्दाचा उपयोग एकादा आक्ट किंवा रेग्युलेशन यासंबंधानें केला असेल तेव्हां, त्या शब्दाचा अर्थ, ज्या तारखेस तो आक्ट किंवा रेग्युलेशन अमलांत येत असेल ती तारीख असा आहे :

"कमिशनर."

(१३) "कमिशनर" ह्या शब्दाचा अर्थ, भागाचा महसूलसंबंधी कारभार ज्याच्या स्वाधीन असेल तो मुख्य अमलदार असा आहे :

"कॉन्सुलर आफिसर."

(१४) "कॉन्सुलर ऑफिसर" ह्या संज्ञेत, कॉन्सल-जनरलचा, कॉन्सलचा, व्हाइस् कॉन्सलचा, कॉन्सुलर एजंटचा, प्रो-कॉन्सलचा आणि ज्या कोणा मनुष्यास त्या त्या वेळीं कॉन्सल जनरल, कॉन्सल, व्हाइस् कॉन्सल अथवा कॉन्सुलर एजंट यांचीं कामें करण्याचा अधिकार दिला असेल त्या माणसाचा समावेश होतो:

"डिस्ट्रिक्ट जज्ज."

(१५) "डिस्ट्रिक्ट जज्ज" या संज्ञेचा अर्थ, एकाद्या मुख्य अवल दिवाणी कोर्टाचा जज्ज असा आहे; परंतु है कोर्ट जेव्हां अवल दिवाणी फिर्यादी घेण्याची आपली मामूल किंवा विशेष हुकुमत चालवील तेव्हां त्या कोर्टाचा समावेश त्या संज्ञेत होणार नाहीं :

"दस्तऐवज."

(१६) "दस्तऐवज" या शब्दांत, जी वस्तु कोणत्याही बाबतीचा दाखला ठेवण्याकरितां वापरण्याचा उद्देश असेल अगर वापरतां येईल त्या वस्तूवर अक्षरांनीं अगर अंकांनीं अगर खुणांनीं, अथवा ह्या साधनांपैकीं एकापेक्षां अधिकांच्या योगानें दर्शित केलेल्या अगर वर्णिलेल्या त्या बाबतीचा समावेश होतो:

"कायदा."

(१७) "कायदा" ह्या शब्दांत (यानंतर व्याख्या केल्याप्रमाणेंच्या) रेग्युलेशनचा आणि बंगाल, मद्रास अथवा मुंबई कोडांतील कोणत्याही रेग्युलेशनचा आणि कोणत्याही आक्टांत अथवा वर सांगितल्या प्रकारच्या कोणत्याही रेग्युलेशनांत असलेल्या कोणत्याही ठरावाचा समावेश होतो:

"बाप."

(१८) "बाप" या शब्दांत ज्या मनुष्यास आपल्या व्यक्तिक कायद्याप्रमाणें दत्तक घेण्याचा अधिकार आहे त्या मनुष्याचे बाबतींत दत्तक घेणारे बापाचा समावेश होतो :

"नगदी साल."

(१९) "नगदी साल" या संज्ञेचा अर्थ एप्रिलच्या पहिल्या तारखेस सुरू होणारें साल असा आहे :

"इमानानें."

(२०) जेव्हां कोणतीही गोष्ट खरोखर प्रामाणिकपणानें केली असेल तेव्हां ती "इमानानें" केली आहे असें समजावें; मग ती हयगईनें केली असो अगर नसो:

"सरकार."

(२१) "सरकार" अथवा "सदहू सरकार" यांत स्थानिक सरकार तसेंच हिंदुस्थान सरकार यांचा समावेश होतो:

"हिंदुस्थान सरकार."

(२२) "हिंदुस्थान सरकार" या संज्ञेचा अर्थ, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल अथवा गव्हर्नर जनरल हा कौन्सिलांतून गैरहजर असल्यास, प्रेसिडेंट इन् कौन्सिल, किंवा एकटा गव्हर्नर जनरल, अनुक्रमें, जो जो अखत्यार कायदेशीर रीतीनें चालवूं शकेल त्या त्या अखत्यारासंबंधानें, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल, प्रेसिडेन्ट इन् कौन्सिल किंवा एकटा गव्हर्नर जनरल, असा आहे :

"मलिका माआझमा" अथवा "राणी."

(२३) "मलिका माआझमा" अथवा "राणी" यांत तिच्या मागून तिच्या गादीवर येणारांचा समावेश होतो:

"है कोर्ट."

(२४) "है कोर्ट" ही संज्ञा दिवाणी कामाच्या संबंधानें वापरली असेल तेव्हां तिचा अर्थ, ती संज्ञा जो आक्ट अगर रेग्युलेशन यांत असेल तो आक्ट अगर रेग्युलेशन ब्रिटिश हिंदुस्थानच्या ज्या भागांत अमलांत असेल त्या भागांतील सर्वांत मुख्य दिवाणी अपिलाचें कोर्ट असा आहे :

(२५) "स्थावर मिळकत" या संज्ञेंत, जमिनीचा व जमीनींतून उत्पन्न होणारे फायद्यांचा व जमिनीत चिकटलेल्या वस्तूंचा व जमिनीस चिकटलेल्या वस्तूंला कायम रीतीनें जडलेल्या वस्तूंचा समावेश होतो: "स्थावर मिळकत."

(२६) "कैद" ह्या शब्दाचा अर्थ, हिंदुस्थानच्या अपराध्यांस शिक्षा करण्याविषयींच्या कायद्यांत सांगितलेल्या दोन प्रकारांपैकीं कोणतेही एका प्रकारची कैद असा आहे: "कैद."

(२७) "हिंदुस्थान" ह्या शब्दाचा अर्थ, ब्रिटिश हिंदुस्थान, आणि मलिका मआझमांची सार्वभौम सत्ता ज्या कोणत्याही देशी राजावर किंवा संस्थानिकावर हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांचे मार्फत किंवा हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांचे ताब्यांतील कोणत्याही गव्हर्नराचे किंवा दुसऱ्या कोणा अमलदाराचे मार्फत अमल चालविण्यांत येत असेल त्या राजाचा किंवा संस्थानिकाचा कोणताही मुलख असा आहे: "हिंदुस्थान."

(२८) "स्थानिक अधिकारी" ह्या संज्ञेचा अर्थ, म्युनिसिपल कमिटी, जिल्हा बोर्ड, पोर्ट कमिशनरांची मंडळी, किंवा ज्या दुसऱ्या अधिकाऱ्यास कोणताही म्युनिसिपल किंवा लोकल फंड यावर निर्बंध ठेवण्याचा किंवा त्याची वहिवाट करण्याचा कायद्यावरून हक्क पोहोंचतो, किंवा ज्याकडे सरकारानें तें काम सोंपविलेलें आहे तो दुसरा अधिकारी, असा आहे: "स्थानिक अधिकारी."

(२९) "स्थानिक सरकार" या संज्ञेचा अर्थ, ज्या आक्टांत किंवा रेग्युलेशनांत हे शब्द असतील तो आक्ट किंवा रेग्युलेशन ब्रिटिश हिंदुस्थानाचे ज्या भागांत अमलांत असेल त्या भागांत राज्यकारभारी चालविण्याचा अधिकार कायद्याअन्वयें ज्या मनुष्यास असेल तो मनुष्य असा आहे: आणि या संज्ञेंत चीफ कमिशनराचा समावेश होतो: "स्थानिक सरकार."

(३०) "मद्रासचा आक्ट" या संज्ञेचा अर्थ, सन १८६१ आणि १८९२ चे हिंदुस्थानांतील कौन्सिलांबाबदचे आक्ट यांअन्वयें मद्रासचे गव्हर्नर इन् कौन्सिल यांनीं केलेला आक्ट असा आहे: "मद्रासचा आक्ट."

(३१) "माजिस्ट्रेट" या शब्दांत, त्या त्या वेळीं अमलांत असलेल्या फौजदारी काम चालविण्याचे रीतीविषयींचे कायद्याअन्वयें माजिस्ट्रेटाचे सर्व किंवा कोणतेही अधिकार चालविणाऱ्या प्रत्येक मनुष्याचा समावेश होतो: "माजिस्ट्रेट."

(३२) "मास्तर" या शब्दाचा उपयोग एकाद्या तारवाच्या संबंधानें केलेला असेल तेव्हां त्याचा अर्थ, (पैलट किंवा हार्बरमास्तर खेरीज करून,) त्या त्या वेळीं ज्या कोणत्याही मनुष्याच्या निर्बंधांत किंवा स्वाधीन तें तारूं असेल तो मनुष्य, असा आहे: (तारवाचा) "मास्तर."

(३३) "महिना" या शब्दाचा अर्थ, ब्रिटिश क्यालेंडरप्रमाणें मोजलेला महिना, असा आहे: "महिना."

(३४) "जंगम मिळकत" या संज्ञेचा अर्थ, स्थावर मिळकत खेरीज करून इतर दरेक प्रकारची मिळकत असा आहे: "जंगम मिळकत."

(३५) "वायव्य प्रांतांचा व अयोध्येचा आक्ट" या संज्ञेचा अर्थ, सन १८६१ व सन १८९२ चे हिंदुस्थानांतील कौन्सिलांबाबदचे आक्ट यांअन्वयें वायव्य प्रांतांच्या व अयोध्येच्या लेफ्टेनेंट गव्हर्नर इन् कौन्सिलांनीं केलेला आक्ट, असा आहे; "वायव्य प्रांतांचा व अयोध्येचा आक्ट."

(३६) "शपथ" या शब्दांत ज्या मनुष्यांस शपथेच्या बदला प्रतिज्ञा किंवा इकरार करण्याची कायद्यावरून परवानगी असेल त्या मनुष्यांचे बाबतींत प्रतिज्ञा व इकरार यांचा समावेश होतो: "शपथ."

(३७) "अपराध" या शब्दाचा अर्थ, त्या त्या वेळीं अमलांत असलेल्या कोणत्याही कायद्यावरून जें कोणतेंही कृत्य किंवा वर्जन शिक्षेस पात्र आहे असें ठरविलें असेल तें कृत्य किंवा वर्जन असा आहे: "अपराध."

"भाग." (३८) "भाग" या शब्दाचा अर्थ, ज्या आक्टांत किंवा रेग्युलेशनांत तो शब्द येईल त्या आक्टाचा किंवा रेग्युलेशनचा भाग असा आहे:

"मनुष्य." (३९) "मनुष्य" या शब्दांत, स्थापन केलेल्या किंवा न केलेल्या कोणतेही कंपनीचा अगर मंडळीचा अगर मनुष्यांचे समुदायाचा समावेश होतो.

"पोलिटिकल एजंट." (४०) "पोलिटिकल एजंट" या संज्ञेंत—

(अ) ब्रिटिश हिंदुस्थानच्या हद्दींबाहेरील कोणत्याही मुलकांतील अगर जागेंतील सरकारच्या तर्फेच्या मुख्य अमलदाराचा, आणि

(ब) जी जागा ब्रिटिश हिंदुस्थानचा भाग नसेल त्या जागीं परराज्याच्या हुकमतीबाबदचे व अपराध्यांस स्वाधीन करण्याबाबदच्या त्या त्या वेळीं अमलांत असलेल्या कायद्याप्रमाणें पोलिटिकल एजंटाचे सर्व किंवा कोणतेही अधिकार चालविण्यास हिंदुस्थान सरकारानें अगर कोणत्याही स्थानिक सरकारानें हिंदुस्थान सरकारचा अगर त्या स्थानिक सरकारचा जो कोणताही अमलदार नेमला असेल त्या अमलदाराचा,

समावेश होतो:

"इलाका शहर." (४१) "इलाका शहर" या संज्ञेचा अर्थ, प्रसंगानुसार, कलकत्ता, मद्रास किंवा मुंबई येथील अदालतीच्या हैकोर्टाची जी मामूल अवल दिवाणी हुकुमत, तिच्या त्या त्या काळीं असलेल्या स्थलसीमा असा आहे:

"प्रिव्ही कौन्सिल." (४२) "प्रिव्ही कौन्सिल" या संज्ञेचा अर्थ, मलिका माआझमांच्या मोस्ट आनरेबल प्रिव्ही कौन्सिलचे त्या त्या वेळचे उमराव व इतर लोक, असा आहे:

"प्रांत." (४३) "प्रांत" या शब्दाचा अर्थ, ज्या मुलुकावर त्या त्या वेळीं कोणतेंही स्थानिक सरकार अमल चालवीत असेल तो मुलूक, असा आहे:

"साधारण सर्व लोकांस पीडा." (४४) "साधारण सर्व लोकांस पीडा" या संज्ञेचा अर्थ, हिंदुस्थानच्या अपराध्यांस शिक्षा करण्याविषयींच्या कायद्यांत जिचीं व्याख्या केली आहे अशी साधारण सर्व लोकांस पीडा, असा आहे:

"नोंदलेलें." (४५) "नोंदलेलें" हा शब्द एकाद्या दस्तऐवजाच्या संबंधानें वापरला असेल तेव्हां त्याचा अर्थ, दस्तऐवज नोंदण्याच्या संबंधानें त्या त्या वेळीं अमलांत असलेल्या कायद्याअन्वयें ब्रिटिश हिंदुस्थानांत नोंदलेलें असा आहे:

"रेग्युलेशन." (४६) "रेग्युलेशन" या शब्दाचा अर्थ, सन १८७० चा हिंदुस्थान सरकाराबाबद आक्ट याअन्वयें केलेला रेग्युलेशन असा आहे:

"कानू." (४७) "कानू" या शब्दाचा अर्थ, कोणत्याही कायद्यावरून दिलेला अधिकार चालवून केलेला कानू असा आहे; आणि या शब्दांत कोणत्याही कायद्याअन्वयें कानू ह्मणून केलेल्या रेग्युलेशनचा समावेश होतो:

"परिशिष्ट." (४८) "परिशिष्ट" या शब्दाचा अर्थ, ज्या आक्टांत अथवा रेग्युलेशनांत तो शब्द असेल त्या आक्टाचें किंवा रेग्युलेशनचें परिशिष्ट असा आहे:

"शेड्युल्ड डिस्ट्रिक्ट." (४९) "शेड्युल्ड डिस्ट्रिक्ट" या संज्ञेचा अर्थ सन १८७४ च्या शेड्युल्ड डिस्ट्रिक्ट आक्टांत व्याख्या केल्याप्रमाणें शेड्युल्ड डिस्ट्रिक्ट असा आहे:

"कलम." (५०) "कलम" या शब्दाचा अर्थ, ज्या आक्टांत अथवा रेग्युलेशनांत तो शब्द आला असेल त्या आक्टाचें किंवा रेग्युलशनचें कलम, असा आहे:

"तारूं." (५१) "तारूं" या शब्दांत ज्या जहाजाचा उपयोग जलपर्यटनांत करण्यांत येत असून जें केवळ वल्ह्यांनींच चालविण्यांत येत नसेल अशा हरेक प्रकारच्या जहाजाचा समावेश होतो:

(९२) "सही" व व्याकरणाच्या संबंधानें या शब्दाचीं होणारीं रूपांतरें व तज्जातीय शब्द यांत, ज्या मनुष्यास आपलें नांव लिहितां येत नसेल त्या मनुष्याच्या संबंधानें "निशाणी" व व्याकरणाच्या संबंधानें त्या शब्दाचीं होणारीं रूपांतरें व तज्जातीय शब्द यांचा समावेश होतो. "सही."

(९३) "मुलगा" या शब्दांत, ज्या मनुष्यास आपल्या व्यक्तिक कायद्याप्रमाणें दत्तक घेण्याचा अधिकार आहे त्या मनुष्याचे बाबतींत, दत्तक मुलग्याचा समावेश होतोः "मुलगा."

(९४) "पोट-कलम" या शब्दाचा अर्थ, ज्या कलमांत हा शब्द येईल त्या कलमाचें पोटकलम असा आहेः "पोट-कलम."

(९५) "आण" या शब्दांत व या शब्दाचीं व्याकरणाच्या संबंधानें होणारीं रूपांतरें व तज्जातीय शब्द यांत, ज्या मनुष्यांस शपथेबद्दल प्रतिज्ञा किंवा इक़रार करण्याची कायद्यावरून परवानगी असेल त्या मनुष्यांच्या बाबतींत, प्रतिज्ञा व इकरार यांचा समावेश होतोः "आण."

(९६) "नाव" या शब्दांत कोणतेंही तारूं अगर होडी किंवा ज्याचा उपयोग जलपर्यटनांत करण्यांत येतो असें दुसऱ्या कोणत्याही प्रकारचें जहाज यांचा समावेश होतोः "नाव."

(९७) "मृत्युलेख" या शब्दांत मृत्युलेखाचे पुरवणीचा व आपखुषीनें मालमिळकतीची मरणोत्तर वांटणी करण्याविषयीं केलेले सर्व लेख यांचा समावेश होतोः "मृत्युलेख."

(९८) "लिहिणें" या शब्दाचा उल्लेख ज्या मजकुरांत केलेला असेल त्यांत, ठशांनीं छापणें, शिळा छापानें छापणें, फोटोग्राफी, आणि शब्द दर्शविण्याच्या किंवा ते जशाचे तसे उतरण्याच्या दुसऱ्या तऱ्हा यांचा समावेश होतो असें समजून त्याचा अर्थ केला पाहिजे : आणि "लिहिणें."

(९९) "वर्ष" या शब्दाचा अर्थ, ब्रिटिश क्यालेंडरप्रमाणें मोजलेलें वर्ष असा आहे. "वर्ष."

४. (१) खालील शब्दांच्या व संज्ञांच्या, ह्मणजे, "आफिडेव्हिट," "बारिस्टर," "ब्रिटिश हिंदुस्थान," "डिस्ट्रिक्ट जज्ज," "बाप," "हिंदुस्थान सरकार," "मलिका मोआझमा" अथवा "राणी," "हैकोर्ट" "स्थावर मिळकत," "कैद," "स्थानिक सरकार," "माजिस्ट्रेट," "महिना," "जंगम मिळकत," "शपथ," "मनुष्य," "कलम," "मुलगा," "आण," "मृत्युपत्र," आणि "वर्ष" या शब्दांच्या व संज्ञांच्या तिसऱ्या कलमांत दिलेल्या व्याख्या, विषयावरून किंवा पूर्वापर संबंधावरून बाध येत नसेल तर, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं तारीख ३ माहे जानुआरी सन १८६८ नंतर केलेल्या सर्व आक्टांस आणि तारीख १४ माहे जानुआरी सन १८८७ रोजीं किंवा त्यानंतर केलेल्या सर्व रेग्युलशेनांसही लागू आहेत. वरील व्याख्या पूर्वीच्या कायद्यांस लागू करणें.

(२) खालील शब्दांच्या आणि संज्ञांच्या ह्मणजे "साह्य करणें," "बाब," "सुरुवात," "नगदी साल", "स्थानिक अधिकारी," "मास्तर," "अपराध," "भाग," "साधारण सर्व लोकांस पीडा," "नोंदलेलें," "परिशिष्ट," "तारूं," "सही," "पोट-कलम," आणि "लिहिणें," या शब्दांच्या व संज्ञांच्या सदरील कलमांत दिलेल्या व्याख्या, विषयावरून किंवा पूर्वापर संबंधावरून बाध येत नसेल तर, तारीख १४ जानुआरी सन १८८७ रोजीं किंवा त्यानंतर केलेल्या गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या सर्व आक्टांस आणि सर्व रेग्युलेशनांस लागू आहेत.

अर्थ करण्यासंबंधाचे सामान्य नियम.

५. (१) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा कोणताही आक्ट जेव्हां अमुक दिवशीं अमलांत येईल असें ह्मटलेलें नसेल तेव्हां, त्यास ज्या दिवशीं गव्हर्नर जनरल यांकडून संमति देण्यांत येईल त्या दिवशीं तो अमलांत येईल. कायदे अमलांत येणें.

(२) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा कोणताही आक्ट जेव्हां, सन १८६१ चा हिंदुस्थानच्या कौन्सिलांबाबद आक्ट ह्याच्या २० व्या कलमाअन्वयें, त्या संबंधाची मलिका माआझमांची संमति प्रदर्शित होण्यावर तहकूब ठेविलेला असेल तेव्हां, तो, अधिक पुढची तारीख निर्दिष्ट केलेली नसल्यास, त्या आक्टास मलिका माआझमांनीं संमति दिली तर, ती संमति योग्य रीतीनें प्रसिद्ध करण्यांत येईल त्या दिवशीं, अमलांत येईऊ.

(३) उलट निर्दिष्ट केलेलें नसेल तर, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा कोणताही आक्ट किंवा कोणताही रेग्युलेशन, त्याच्या सुरवातीच्या आधींचा दिवस संपल्याबरोबर अमलांत येईल असा त्याचा अर्थ करावा.

रद्द करण्याचा परिणाम.

६. आजपर्यंत केलेला किंवा ह्यानंतर करण्यांत येईल तो कोणताही कायदा ह्या आक्टाअन्वयें किंवा ह्या आक्टाच्या सुरवातीनंतर केलेल्या हिंदुस्थान सरकारच्या कोणत्याही आक्टाअन्वयें अगर कोणत्याही रेग्युलेशनअन्वयें, रद्द करण्यांत येईल तेव्हां, निराळा उद्देश दिसून येत नसेल तर, त्याप्रमाणें तो कायदा रद्द केल्यावरून--

(अ) तो रद्द करण्याचा ठराव अमलांत येईल त्या वेळेस अमलांत नसलेली किंवा अस्तित्वांत नसलेली अशी कोणतीही गोष्ट पुनः चालू होणार नाहीं; अगर

(ब) ह्याप्रमाणें रद्द केलेल्या कोणत्याही कायद्याच्या पूर्वीच्या अमलास किंवा त्या कायद्याअन्वयें योग्य रीतीनें केलेल्या कोणत्याही कृत्यास किंवा भोगलेल्या कोणत्याही बाबतीस बाध येणार नाहीं; अगर

(क) ह्याप्रमाणें रद्द केलेल्या कोणत्याही कायद्याअन्वयें मिळविलेल्या, मिळालेल्या किंवा प्राप्त झालेल्या कोणत्याही हक्कास, अनन्यग्राह्याधिकारास, कर्तव्यतेस किंवा पात्रतेस बाध येणार नाहीं; अगर

(ड) ह्याप्रमाणें रद्द केलेल्या कोणत्याही कायद्याविरुद्ध केलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल प्राप्त झालेल्या कोणत्याही गुन्हेगारीच्या, सरकारदाखल होण्याच्या किंवा शिक्षेच्या पात्रतेस बाध येणार नाहीं;

(इ) सदर्हू प्रकारच्या कोणत्याही हक्काबद्दलच्या, अनन्यग्राह्याधिकाराबद्दलच्या, कर्तव्यतेबद्दलच्या, पात्रतेबद्दलच्या, गुन्हेगारीबद्दलच्या, सरकारदाखल होण्याबद्दलच्या अगर शिक्षेबद्दलच्या कोणत्याही चौकशीस, चालविलेल्या कायद्यासंबंधी कामास, किंवा इलाजास बाध येणार नाहीं;

आणि सदर्हू रद्द करणारा आक्ट अगर रेग्युलेशन पसार न झाल्याप्रमाणेंच सदर्हू चौकशी, चालविलेलें कायद्यासंबंधी काम अगर इलाज करतां येईल, चालू ठेवतां येईल अगर अमलांत आणतां येईल, आणि सदर्हू प्रकारची कोणतीही गुन्हेगारी, सरकारदाखल करण्याचा ठराव अगर शिक्षा ठरवितां येईल.

रद्द केलेले कायदे पुनः चालू करणें.

७. (१) ह्या आक्टाच्या सुरवातीनंतर केलेल्या गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या कोणत्याही आक्टांत किंवा कोणत्याही रेग्युलेशनांत, सर्वांशीं किंवा अंशतः रद्द केलेला कोणताही कायदा सर्वांशीं किंवा अंशतः पुनः चालू करण्याचें कारण असेल त्या प्रसंगीं, तें कारण स्पष्टपणें लिहिणें अवश्य आहे.

(२) हें कलम, सन १८६८ च्या जानेवारी महिन्याच्या तिसऱ्या तारखेनंतर केलेल्या गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या सर्व आक्टांसही आणि सन १८८७ च्या जानेवारी महिन्याच्या चवदाव्या तारखेरोजीं किंवा त्या तारखेनंतर केलेल्या सर्व रेग्युलेशनांसही लागू आहे.

८. ह्या आक्टांत किंवा ह्या आक्टाच्या सुरवातीनंतर केलेल्या गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या कोणत्याही आक्टांत किंवा कोणत्याही रेग्युलेशनांत कोणत्याही पूर्वीच्या कायद्यांतील कोणताही ठराव रद्द करून फेरफारांनिशीं किंवा फेरफारांशिवाय पुनः ठरविण्यांत येईल त्या प्रसंगीं, ह्याप्रमाणें रद्द केलेल्या ठरावावर कोणत्याही इतर कायद्यांत किंवा लेखांत दिलेले हवाले, निराळा उद्देश दिसून येत नसेल तर, सदर्हूप्रमाणें पुनः ठरविलेल्या ठरावांविषयीं आहेत असें समजून त्यांचा अर्थ करावा.

रद्द केलेल्या कायद्यांवर दिलेल्या हवाल्यांचा अर्थ.

९. (१) ह्या आक्टाच्या सुरवातीनंतर केलेल्या गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या कोणत्याही आक्टांत किंवा कोणत्याही रेग्युलेशनांत, दिवसांच्या कोणत्याही मालिकेंतून किंवा दुसऱ्या कोणत्याही मुदतींतून पहिला दिवस वगळण्याच्या कारणासाठीं "पासून" शब्दाचा उपयोग केला असतां आणि दिवसांच्या कोणत्याही मालिकेंत किंवा दुसऱ्या कोणत्याही मुदतींत शेवटच्या दिवसाचा समावेश करण्याच्या कारणासाठीं "पर्यंत" शब्दाचा उपयोग केला असतां बस होईल.

मुदतीची सुरवात व शेवट.

(२) हें कलम, सन १८६८ च्या जानेवारी महिन्याच्या तिसऱ्या तारखेनंतर केलेल्या गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या सर्व आक्टांसही आणि सन १८८७ च्या जानेवारी महिन्याच्या चवदाव्या तारखेस किंवा त्या तारखेनंतर केलेल्या सर्व रेग्युलेशनांसही लागू आहे.

१०. (१) ह्या आक्टाच्या सुरवातीनंतर केलेल्या गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या कोणत्याही आक्टाअन्वयें किंवा कोणत्याही रेग्युलेशनअन्वयें, कोणतेंही कृत्य किंवा काम कोणत्याही कोर्टांत अगर कचेरींत विवक्षित दिवशीं किंवा ठरींव मुदतीच्या आंत करावें किंवा चालवावें ह्मणून फर्माविलेलें असेल अगर त्याबद्दल तशी परवानगी दिलेली असेल, त्या बाबतींत, तें कोर्ट अगर ती कचेरी त्या दिवशीं किंवा त्या ठरविलेल्या मुदतीच्या शेवटच्या दिवशीं बंद असल्यास, तें कृत्य अगर काम, तें कोर्ट अगर ती कचेरी तदनंतरच्या ज्यां पुढच्या दिवशीं खुलें अगर खुली असेल त्या दिवशीं केल्यास अगर चालविल्यास तें योग्य वेळीं करण्यांत आलें अगर चालविण्यांत आलें असें समजलें पाहिजे.

मुदत मोजणें.

मात्र, सन १८७७ चा हिंदुस्थानचा मुदतीचा आक्ट ज्या कोणत्याही कृत्यास किंवा कामास लागू आहे त्या कृत्यास किंवा कामास ह्या कलमांतील कोणताही ठराव लागू होणार नाहीं.

(२) हें कलम, सन १८८७ च्या जानेवारी महिन्याच्या चवदाव्या तारखेस किंवा त्या तारखेनंतर केलेल्या गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या सर्व आक्टांसही व सर्व रेग्युलेशनांसही लागू आहे.

११. ह्या आक्टाच्या सुरवातीनंतर केलेल्या गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या कोणत्याही आक्टाच्या अगर कोणत्याही रेग्युलेशनच्या कारणांसाठीं कोणतेंही अंतर मोजतांना, तें अंतर, निराळा उद्देश दिसून येत नसेल तर, आडव्या सपाटीवर सरळ रेषेनें मोजलें पाहिजे.

अंतरें मोजणें.

१२. हल्लीं अमलांत असणारे किंवा पुढें अमलांत येणारे कोणतेंही कायद्यावरून, कोणतेही मालाचे किंवा व्यापाराचे जिन्नसाचे कोणत्याही विवक्षित परिमाणावर, वजनाप्रमाणें, मापाप्रमाणें किंवा किंमतीप्रमाणें कस्टमची किंवा एक्सैसची ड्यूटी किंवा त्या प्रकारची दुसरी कोणतीही जकात घेतां येत असेल तेव्हां, त्याच दरानें तशीच जकात अधिक किंवा कमी परिमाणावर घेतां येईल.

कायद्यांतला ड्यूटीचा दर प्रमाणानें समजावा.

लिंग व वचन.

१३. गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या सर्व आक्टांत व सर्व रेग्युलेशनांत, विषयावरून किंवा पूर्वापर संबंधावरून बाध येत नसेल तर,—

(१) पुरुषवाचक शब्दांत स्त्रियांचा समावेश होतो; आणि

(२) एकवचनी शब्दांत बहुवचनाचा समावेश होतो आणि बहुवचनी शब्दांत एकवचनाचा समावेश होतो.

अधिकार व कामदार.

सरकारास दिलेले अधिकार वेळोवेळीं चालविणें.

१४. (१) ह्या आक्टाच्या सुरवातीनंतर केलेल्या गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या कोणत्याही आक्टाअन्वयें किंवा कोणत्याही रेग्युलेशनअन्वयें सरकारास कोणताही अधिकार दिलेला असेल तेव्हां, तो अधिकार, प्रसंग पडेल त्याप्रमाणें, वेळोवेळीं चालविण्याचा अख्त्यार आहे.

(२) हें कलम सन १८८७ च्या जानेवारी महिन्याच्या चवदाव्या तारखेस अगर त्या तारखेनंतर केलेल्या गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या सर्व आक्टांसही व सर्व रेग्युलेशनांसही लागू आहे.

नेमणूक करण्याच्या अधिकारांत, हुद्याच्या नात्यानें नेमणूक करण्याच्या अधिकाराचा समावेश होतो.

१५. गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या कोणत्याही आक्टाअन्वयें किंवा कोणत्याही रेग्युलेशनअन्वयें कोणत्याही मनुष्यास कोणत्याही हुद्यावर किंवा कोणतेंही काम करण्यासाठीं नेमण्याचा अधिकार दिलेला असेल, तेव्हां, स्पष्ट रीतीनें निराळें ठरविलेलें नसेल तर, अशी कोणतीही नेमणूक ह्या आक्टाच्या सुरवातीनंतर करावयाची असल्यास ती नांवानें किंवा हुद्याच्या नात्यानें करण्याचा अधिकार असेल.

नेमणूक करण्याच्या अधिकारांत सस्पेंड करण्याच्या किंवा बर्तर्फ करण्याच्या अधिकाराचा समावेश होतो.

१६. गव्हर्नर जनरलाच्या कोणत्याही आक्टाअन्वयें किंवा कोणत्याही रेग्युलेशनअन्वयें, कोणतीही नेमणूक करण्याचा अधिकार दिलेला असेल तेव्हां, निराळा उद्देश दिसून येत नसेल तर, ती नेमणूक करण्याचा अधिकार असलेल्या अधिकाऱ्यास, त्यानें तो अधिकार चालवून ज्या मनुष्याची नेमणूक केलेली असेल, त्या मनुष्यास सस्पेंड अगर बर्तर्फ करण्याचाही अख्त्यार असेल.

एका अधिकाऱ्याचे जागेवर दुसरा अधिकारी नेमणें.

१७. (१) ह्या आक्टाच्या सुरवातीनंतर केलेल्या गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या कोणत्याही आक्टांत किंवा कोणत्याही रेग्युलेशनांत, कोणत्याही हुद्याचीं कामें त्या त्या वेळीं करीत असलेल्या प्रत्येक मनुष्यास किंवा कित्येक मनुष्यांस कोणताही कायदा लागू आहे असें निर्दिष्ट करण्याच्या कारणासाठीं, तीं कामें हल्लीं जो अधिकारी चालवीत असेल किंवा तीं कामें जो अधिकारी सामान्यतः चालवीत असेल, त्याच्या हुद्याचें नांव सांगितलें ह्मणजे बस होईल.

(२) हें कलम, सन १८९८ च्या जानेवारी महिन्याच्या तिसऱ्या तारखेनंतर केलेल्या गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या सर्व आक्टांसही आणि सन १८८७ च्या जानेवारी महिन्याच्या चवदाव्या तारखेस अगर त्या तारखेनंतर केलेल्या सर्व रेग्युलेशनांसही लागू आहे.

स्थानापन्न.

१८. (१) ह्या आक्टाच्या सुरवातीनंतर केलेल्या गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या कोणत्याही आक्टांत किंवा कोणत्याही रेग्युलेशनांत, कोणतेही कामदारांचे किंवा ज्या मंडळ्यांतील सभासदांच्या जागा कधीं रिकाम्या पडत नाहींत त्या मंडळ्यांचे स्थानापन्नांशीं कोणत्याही कायद्याचा संबंध दर्शविण्याच्या कारणासाठीं, त्या कायद्याचा त्या कामदारांशीं अगर मंडळ्यांशीं असलेला संबंध सांगितला ह्मणजे बस होईल.

(२) हें कलम, सन १८६८ च्या जानेवारी महिन्याच्या तिसऱ्या तारखेनंतर केलेल्या गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या सर्व आक्टांसही आणि सन १८८७ च्या जानेवारी महिन्याच्या चवदाव्या तारखेस अगर त्या तारखेनंतर केलेल्या सर्व रेग्युलेशनांसही लागू आहे.

१९. (१) ह्या आक्टाच्या सुरवातीनंतर केलेल्या गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या कोणत्याही आक्टांत किंवा कोणत्याही रेग्युलेशनांत, कोणतेही हुद्याचे मुख्यासंबंधाचा किंवा वरिष्ठासंबंधाचा कायदा, जे जे डेप्युटी किंवा ताब्यांतील अमलदार आपल्या मुख्याच्यावतीनें त्या हुद्याचीं कामें कायदेशीर रीतीनें चालवीत असतील त्यांस लागू होईल असें सांगण्याच्या कारणासाठीं, त्या वरिष्ठाचीं कामें निर्दिष्ट केलीं असतां बस होईल. मुख्य अधिकारी व त्याचे ताब्यांतील अमलदार.

(२) हें कलम, सन १८६८ च्या जानेवारी महिन्याच्या तिसऱ्या तारखेनंतर केलेल्या गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या सर्व आक्टांसही आणि सन १८८७ च्या जानेवारी महिन्याच्या चवदाव्या तारखेस अगर त्या तारखेनंतर केलेल्या सर्व रेग्युलेशनांसही लागू आहे.

कायद्यांअन्वयें केलेले हुकुम, कानू, इत्यादिकांच्या संबंधाचे ठराव.

२०. गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या कोणत्याही आक्टाअन्वयें किंवा कोणत्याही रेग्युलेशनअन्वयें कोणताही हुकुम, योजना, कानू, नमुना किंवा पोटकायदा करण्याचा अधिकार दिलेला असेल, तेव्हां, तो हुकुम, योजना, कानू, नमुना किंवा पोटकायदा ह्या आक्टाच्या सुरवातीनंतर केलेला असल्यास, त्यांत उपयोग केलेल्या संज्ञांचे अर्थ, विषयावरून अगर संदर्भावरून बाध येत नसेल तर, तो अधिकार देणाऱ्या आक्टांत किंवा रेग्युलेशनांत त्या संज्ञांस जे जे अर्थ दिलेले असतील तेच तेच असतील. कायद्यांअन्वयें केलेल्या हुकुम वगैरेचा अर्थ करणें.

२१. गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या कोणत्याही आक्टाअन्वयें किंवा कोणत्याही रेग्युलेशनअन्वयें, कोणतेही हुकुम, कानू अगर पोटकायदे करण्याचा अधिकार दिलेला असेल तेव्हां, त्या अधिकारांत, ह्याप्रमाणें केलेल्या कोणत्याही हुकुमांत कानूंत अगर पोटकायद्यांत जास्त मजकुर घालण्याच्या, ते सुधारण्याच्या, त्यांत फेरफार करण्याच्या अगर ते रद्द करण्याच्या अधिकाराचा समावेश होतो; मात्र हा अधिकार त्या दिलेल्या अधिकाराप्रमाणेंच चालवावयाचा असून, तो दिलेला अधिकार कोणत्याही मंजुरीस किंवा शर्तीस पात्र असल्यास, त्या मंजुरीस किंवा शर्तीस पात्र राहील. हुकुम, कानू अगर पोटकायदे करण्याच्या अधिकारांत त्या हुकुमांत कानूंत अगर पोट कानूंत जास्त मजकूर घालण्याच्या, ते सुधारण्याच्या, त्यांत फेरफार करण्याच्या अगर ते रद्द करण्याच्या अधिकाराचा समावेश होतो.

२२. गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा जो कोणताही आक्ट किंवा जो कोणताही रेग्युलेशन ठरल्यानंतर लागलाच अमलांत यावयाचा नसेल त्या आक्टावरून किंवा रेग्युलेशनवरून जेव्हां, तो आक्ट किंवा रेग्युलेशन लागू होण्याच्या संबंधानें, किंवा त्या आक्टाअन्वयें किंवा रेग्युलेशनअन्वयें कोणतेंही कोर्ट किंवा कचेरी स्थापण्याच्या किंवा त्याअन्वयें कोणताही जज्ज किंवा अमलदार नेमण्याच्या संबंधानें, किंवा त्या आक्टाअन्वयें अगर रेग्युलेशनअन्वयें कोणतीही गोष्ट कोणत्या मनुष्यानें अगर कोणत्या वेळीं अगर कोणत्याजागीं अगर कोणत्या रीतीनें अगर कोणती फी घेऊन करावयाची त्यासंबंधानें कानू अगर पोटकायदे करण्याचा किंवा हुकुम फर्माविण्याचा अधिकार दिलेला असेल, तव्हां, तो अधिकार, तो आक्ट अगर रेग्युलेशन ठरल्यानंतर कोणत्याही वेळीं चालविण्याचा अखत्यार आहे; परंतु ह्याप्रमाणें केलेले कानू अथवा पोटकायदे अगर फर्माविलेले हुकुम, तो आक्ट अगर रेग्युलेशन सुरू होई तोंपर्यंत अमलांत येणार नाहींत. कायदा ठरणें व सुरू होणें यांच्या दरमियान कानू अगर पोट कायदे करणें आणि हुकुम फर्माविणें.

२३. गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या कोणत्याही आक्टावरून किंवा कोणत्याही रेग्युलेशनवरून, कानू अगर पोटकायदे करण्याचा अधिकार, ते कानू अगर पोटकायदे पूर्वी प्रसिद्ध करून मग ठरवावे अशी शर्त सांगून दिला असेल तेव्हां खालील ठराव लागू होतीलः ते येणेंप्रमाणेः— पूर्वी प्रसिद्ध करून कानू अगर पोटकायदे ठरवणें या गोष्टीस लागू असणारे ठराव.

(१) ते कानू अगर पोट कायदे करण्याचा अखत्यार असणाऱ्या अधिकाऱ्यानें, ते करण्यापूर्वी, योजिलेल्या कानूंचा अगर पोटकायद्यांचा मसुदा, ते कानू अगर पोटकायदे ज्या मनुष्यांस लागू होण्याचा संभव असेल त्या मनुष्यांच्या माहितीसाठीं प्रसिद्ध केला पाहिजे ;

(२) सदर्हू मसुदा प्रसिद्ध करणें तो, त्या अधिकाऱ्यास पुरेशी वाटेल त्या रीतीनें प्रसिद्ध केला पाहिजे, किंवा, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांजकडून अगर स्थानिक सरकाराकडून जी रीत फर्मावण्यांत येईल त्या रीतीनें प्रसिद्ध करावा असें पूर्वी प्रसिद्ध करण्याबद्दलच्या शर्तीवरून अवश्य असेल तर, तशा रीतीनें प्रसिद्ध केला पाहिजे ;

(३) सदर्हू मसुद्याबरोबर एक नोटीस प्रसिद्ध करून, तींत, त्या मसुद्याचा विचार कोणत्या तारखेस किंवा कोणत्या तारखेनंतर करण्यांत येईल तें सांगितलें पाहिजे ;

(४) सदर्हूप्रमाणें निर्दिष्ट केलेल्या तारखेपूर्वी त्या मसुद्याबाबद कोणत्याही मनुष्याकडून जी कोणतीही हरकत किंवा सूचना, ते कानू अगर पोटकायदे करण्याचा अखत्यार असलेल्या अधिकाऱ्याकडे येईल, तिचा विचार ते कानू अगर पोटकायदे करण्याचा अखत्यार असलेल्या त्या अधिकाऱ्यानें, आणि जेव्हां ते कानू अगर पोटकायदे दुसऱ्या अधिकाऱ्याच्या मंजुरीनें, पसंतीनें किंवा संमतीनें करावयाच्या असतील तेव्हां तशा दुसऱ्या अधिकाऱ्यानेंही केला पाहिजे.

(५) जो कोणताही कानू अगर पोटकायदा, कानू अगर पोटकायदे पूर्वी प्रसिद्ध करून मग करण्याचा अधिकार चालवून केलेला आहे असा दिसत असेल, तो गझेटांत प्रसिद्ध करण्यांत आला ह्मणजे, तें कृत्य, तो कानू अगर पोट-कायदा योग्य रीतीनें केला असल्याबद्दल निरुत्तर पुरावा होईल.

रद्द करून पुनः ठरविलेल्या कायद्यांअन्वयें केलेले हुकुम वगैरे चालू असणें.

२४. गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा कोणताही आक्ट किंवा कोणताही रेग्युलेशन, ह्या आक्टाच्या सुरवातीनंतर रद्द करण्यांत येऊन फेरफारांनिशीं किंवा फेरफारांशिवाय पुनः ठरविण्यांत येईल, तेव्हां, उलट स्पष्ट रीतीनें ठरविलेलें नसल्यास, त्या रद्द केलेल्या आक्टाअन्वयें अगर रेग्युलेशनअन्वयें फर्मावलेला कोणताही हुकुम, योजना, कानू, नमुना अगर पोटकायदा, त्याच्या बद्दला, सदर्हू प्रमाणें पुनः ठरविलेल्या ठरावाअन्वयें कोणताही हुकुम, योजना, कानू, नमुना अगर पोटकायदा फर्मावलेला नसल्यास किंवा फर्मावण्यांत येई तोंपर्यंत, त्या पुनः ठरविलेल्या ठरावांस विरुद्ध नसेल तितक्या अंशानें, अमलांत राहील आणि तो सदर्हूप्रमाणें पुनः ठरविलेल्या ठरावांअन्वयें फर्माविला आहे असें समजलें पाहिजे.

किरकोळ.

दंड वसूल करणें.

२५. हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याबाबद कायदा याचीं कलमें ६३ ते ७०, आणि दंड वसूल करण्याकरितां वारंटें काढण्याबाबदचे व तीं बजावण्याबाबदचे त्या त्या वेळीं अमलांत असलेले फौजदारी काम चालविण्याच्या रीतीच्या कायद्याचे ठराव, कोणत्याही आक्टांत, रेग्युलेशनांत, कानूंत अगर पोटकायद्यांत उलट स्पष्ट ठराव नसेल तर त्या आक्टाअन्वयें, रेग्युलेशनाअन्वयें, कानूअन्वयें अगर पोटकायद्याअन्वयें केलेल्या सर्व दंडांस लागू होतील.

दोन अगर जास्त कायद्यांअन्वयें शिक्षा करण्यास पात्र अशा अपराधांबद्दल ठराव.

२६. कोणतेंही कृत्य किंवा वर्जन दोन अगर जास्त कायद्यांअन्वयें अपराध होत असेल तेव्हां, अपराधी, त्या दोन किंवा अधिक कायद्यांपैकीं कोणत्याही कायद्याअन्वयें फौजदारींत काम चालविलें जाण्यास व शिक्षा केली जाण्यास पात्र होईलः मात्र तो एकाच अपराधाबद्दल दोनदां शिक्षा केली जाण्यास पात्र होणार नाहीं.

२७. ह्या आक्टाच्या सुरवातीनंतर केलेल्या गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या कोणत्याही आक्टावरून किंवा कोणत्याही रेग्युलेशनवरून कोणताही दस्तऐवज पोस्टानें बजाविण्याविषयीं अधिकार दिलेला असेल अगर हुकुम केलेला असेल, आणि त्यासंबंधानें "बजावणें" हा शब्द किंवा "देणें" अगर "पाठविणें" यांपैकीं कोणताही शब्द किंवा इतर कोणतीही संज्ञा वापरलेली असेल, तेव्हां, ती बजावणी, निराळा उद्देश दिसून येत नसल्यास, तो दस्तऐवज आंत घातलेल्या पाकिटावर योग्य पत्ता लिहून तें पाकीट आगाऊ हांशील भरून रजिस्टर करून पोस्ट केलें असतां करण्यांत आली आहे असें, आणि, उलट शाबीत करण्यांत न येईल तर तें पाकिट पोस्टाच्या नेहमींच्या क्रमाप्रमाणें ज्या वेळीं स्वाधीन केलें जाईल त्या वेळीं करण्यांत आली आहे असें, समजलें पाहिजे. पोस्टाच्या द्वारें बजावणें याचा अर्थ.

२८. गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या कोणत्याही आक्टांत किंवा कोणत्याही रेग्युलेशनांत, आणि अशा कोणत्याही आक्टाअन्वयें किंवा रेग्युलेशनअन्वयें किंवा त्यासंबंधानें केलेल्या कोणत्याही कानूंत, पोटकायद्यांत, लेखांत किंवा दस्तऐवजांत कोणत्याही कायद्याचा उल्लेख करणें तो, त्यास दिलेल्या सरनाम्यावर किंवा लहान सरनाम्यावर (असल्यास) हवाला देऊन अगर त्याच्या नंबरावर व वर्षावर हवाला देऊन केला असतां चालेल; आणि कोणत्याही कायद्यांतल्या कोणत्याही ठरावाचा उल्लेख करणें तो, त्या कायद्याच्या ज्या कलमांत किंवा पोटकलमांत तो ठराव असेल त्या कलमावर किंवा पोटकलमावर हवाला देऊन केला असतां चालेल. कायद्यांचा उल्लेख करणें.

(२) ह्या आक्टांत आणि ह्या आक्टाच्या सुरवातीनंतर केलेल्या गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या कोणत्याही आक्टांत किंवा कोणत्याही रेग्युलेशनांत दुसऱ्या एकाद्या कायद्याच्या कोणत्याही भागाचें कोणतेंही वर्णन किंवा उल्लेख केलेला असेल, त्याचा अर्थ करतांना त्यांत, निराळा उद्देश दिसून येत नसेल तर, त्या वर्णन किंवा उल्लेख केलेल्या भागाच्या सुरवातीचा ह्मणून आणि शेवटचा ह्मणून जो शब्द, कलम किंवा दुसरा भाग सांगितलेला असेल अगर त्याबद्दल हवाला दिलेला असेल, त्या शब्दाचा, कलमाचा किंवा भागाचा समावेश होतो असें समजून अर्थ केला पाहिजे.

२९. ह्या आक्टाच्या सुरवातीनंतर केलेल्या आक्टांच्या, रेग्युलेशनांच्या, कानूंच्या अगर पोट-कायद्यांच्या अर्थासंबंधाचे जे ह्या आक्टाचे ठराव, त्यांवरून, ह्या आक्टाच्या सुरवातीपूर्वी केलेल्या कोणत्याही आक्टाच्या, रेग्युलेशनच्या, कानूंच्या अगर पोट-कायद्याच्या अर्थास बाध येणार नाहीं; मग तो आक्ट, रेग्युलेशन, कानू अगर पोटकायदा, ह्या आक्टाच्या सुरवातीनंतर केलेल्या एकाद्या आक्टाअन्वयें, रेग्युलेशनअन्वयें, कानूअन्वयें अगर पोट-कायद्याअन्वयें चालू ठेविलेला किंवा सुधारलेला असला तरी चालेल. पूर्वींचे कायदे, कानू व पोट कायदे कायम राहणें.

परिशिष्ट.

रद्द केलेले कायदे.

(कलम २ पहा.)

वर्ष.	नंबर.	सरनामा अगर विषय.	किती रद्द केला तें.
१८६८	१	सन १८६८ चा सामान्य कलमांचा आक्ट.	सगळा.
१८७२	१	सन १८७२ चा हिंदुस्थानचा पुराव्याचा आक्ट.	सन १८६८ चा आक्ट १ ला ह्यासंबंधाचा आहे तेवढा.
१८८७	१	सन १८८७ चा सामान्य कलमांचा आक्ट.	सगळा.
१८९१	१२	सन १८९१ चा रद्द करण्याबाबदचा व सुधारण्याबाबदचा आक्ट.	सन १८६८ चा आक्ट १ ला ह्यासंबंधाचा आहे तेवढा.

(सही) जे. एम्. म्याक्फर्सन,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.
(True translation)
M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

रेव्हेन्यू डिपार्टमेंट.

मुकाम जंजिरे मुंबई, तारीख ३१ माहे मार्च सन १८९७.

नंबर २९६९.—हिंदुस्थान सरकारचा खालील जाहिरनामा पुनः प्रसिद्ध केला असेः—

"फिनान्स ॲण्ड कामर्स डिपार्टमेंट.

सेपरेट रेव्हेन्यू.

स्टांप.

नान् जुडीशियल.

मुक्काम कलकत्ता तारीख २६ माहे मार्च सन १८९७.

नंबर १३८०—एस. आर.—सन १८७९ चा हिंदुस्थानचा स्टांप आक्ट ह्याच्या ८ व्या कलमावरून दिलेले अधिकार चालवून, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे असें फर्मावीत आहेत कीं, सदहू आक्टाच्या २ ऱ्या परिशिष्टाच्या १३ व्या आर्टिकलापैकीं (ब) रकमेंत सांगितलेल्या वर्गाच्या पत्र्यांच्या ट्रान्सफरींवर त्या आक्टाअन्वयें पडणारी फी माफ केली आहे.

(सही) जे. एफ्. फिन्ले,

सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार."

आलीजाह गव्हर्नर साहेब बहादुर इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून,

(सही) जे. मांटीथ,

आक्टिंग चीफ सेक्रेटरी निसबत सरकार.

(True translation)

M. A BAIG,

Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.